RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक २४(२)] शुक्रवार, जून १२, २०१५/ज्येष्ठ २२, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ३७

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश . . . . . . | पृष्ठे १ ते ३ |

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जून २०१५.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2015.

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

### सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६६ चा महा. ४१. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे जिचा उल्लेख " महसूल संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४८ मध्ये,— १९६६ चा महा. ४१.

(एक) पोट-कलम ७ मध्ये,—

(क) " तिपटीहून जास्त नसेल अशी ठरविण्यात येईल इतकी रक्कम जिल्हाधिकाऱ्याने लेखी आदेश दिल्यावर " या मजकुराऐवजी " पाचपट इतकी शास्तीची रक्कम, जिल्हाधिकाऱ्याने किंवा याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही महसुली अधिकाऱ्याने, लेखी आदेश दिल्यावर " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परंतुक वगळण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (८) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (८)(१) पोट-कलम (७) च्या तरतुदींस बाध न येता जिल्हाधिकाऱ्यांस किंवा याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसेल अशा कोणत्याही महसुली अधिकाऱ्यास ज्यावरील हक्क राज्य शासनाकडे निहित आहे व राज्य शासनाने ज्याचे अभिहस्तांकन केलेले नाही अशा कोणत्याही खाणीतून, दगडाच्या खाणीतून किंवा पोट-कलम (७) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही जागेतून काढलेले, हलविलेले, गोळा केलेले, दुसऱ्या जागी नेलेले, उचलून घेतलेले किंवा विल्हेवाट लावलेले कोणतेही खनिज ताब्यात घेता येईल व ते सरकारजमा करता येईल, आणि तसेच, त्यास, गौण खनिजे अनधिकृतपणे काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरलेली कोणतीही यंत्रसामग्री व साधनसामग्री आणि त्यांच्या वाहतुकीकरिता नेमलेली वाहतुकीची कोणतीही साधने ताब्यात घेता येतील आणि ती सरकारजमा करता येतील.

(२) गौण खनिजे अनधिकृतपणे काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी किंवा त्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली पोट-कलम (१) अन्वये ताब्यात घेतलेली अशी यंत्रसामग्री किंवा साधनसामग्री किंवा वाहतुकीची साधने, अशा प्रकारे ती ताब्यात घेतल्याच्या अठ्ठेचाळीस तासांच्या कालावधीच्या आत, जिल्हाधिकाऱ्यांसमोर किंवा याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा इतर अधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात येईल, ज्यास, अशी ताब्यात घेतलेली यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा वाहतुकीची साधने त्यांच्या मालकाने विहित करण्यात येईल अशी शास्ती प्रदान केल्यावर, आणि तसेच, अशी ताब्यात घेतलेली यंत्रसामग्री, साधनसामग्री व वाहतुकीची साधने यांचा वापर, भविष्यात अनधिकृतपणे गौण खनिजे काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी व त्यांची वाहतूक करण्यासाठी करणार नाही असे नमूद असलेला, ताब्यात घेतलेल्या यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा वाहतुकीची साधने यांच्या बाजारमूल्यापेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचा वैयक्तिक जातमुचलका दिल्यावर, अशी ताब्यात घेतलेली यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा वाहतुकीची साधने सोडून देता येतील.".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३२८ ची सुधारणा.

**३.** महसूल संहितेच्या कलम ३२८ मधील, पोट-कलम (२) मध्ये, खंड (एकोणीस) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (एकोणीस) कलम ४८ च्या पोट-कलम (८) अन्वये गौण खनिजे अनधिकृतपणे काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरलेली यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा वाहतुकीची साधने सोडून देण्याकरिता, मालकाकडून प्रदान करण्यात यावयाची शास्ती विहित करण्यासाठीचे नियम ; आणि उक्त कलम ४८ च्या पोट-कलम (९) अन्वये, गौण खनिजे काढणे व ते काढून नेणे या गोष्टींचे नियमन करण्यासाठीचे नियम ; ".

## निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ४८ मध्ये खाणी व खनिजे यांवरील शासनाच्या मालकी हक्काबाबतची तरतूद आहे.

उक्त कलम ४८ च्या पोट-कलम (७) मध्ये, वैध प्राधिकारावाचून काढलेल्या, हलविलेल्या, गोळा केलेल्या, दुसऱ्या जागी नेलेल्या, उचलून घेतलेल्या किंवा विल्हेवाट लावलेल्या खनिजांच्या बाजारमूल्याच्या तिपटीहून जास्त नसेल अशी शास्ती निर्धारित करण्याची तरतूद आहे. ही शास्ती, अशा काढलेल्या, हलविलेल्या, गोळा केलेल्या, दुसऱ्या जागी नेलेल्या, उचलून घेतलेल्या किंवा विल्हेवाट लावलेल्या खनिजांच्या बाजारमूल्याच्या " तिपटी " वरून " पाचपट " इतकी वाढवण्याकरिता, उक्त पोट-कलम (७) मध्ये सुधारणा करणे महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते.

२. उक्त कलम ४८ च्या पोट-कलम (८) मध्ये, अशी तरतूद आहे की, जिल्हाधिकाऱ्यास, ज्यावरील हक्क राज्य सरकारकडे निहित आहे व राज्य सरकारने ज्याचे अभिहस्तांकन केलेले नाही, अशा कोणत्याही खाणीतून, दगडाच्या खाणीतून किंवा पोट-कलम (७) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही जागेतून काढलेले, हलविलेले, गोळा केलेले, दुसऱ्या जागी नेलेले, उचलून घेतलेले किंवा विल्हेवाट लावलेले कोणतेही खनिज ताब्यात घेता येईल व ते सरकारजमा करता येईल.

तथापि, पोट-कलम (८) च्या तरतुदी ह्या, अनधिकृतपणे गौण खनिजे काढणे, इत्यादींसाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री व साधनसामग्री व अशा गौण खनिजांची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणारी वाहतुकीची साधने ताब्यात घेण्याचा व सरकारजमा करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यास प्रदान करीत नाहीत.

म्हणून, बेकायदेशीरपणे गौण खनिजे काढणे आणि त्यांची वाहतूक करणे यास प्रतिबंध करण्याच्या हेतूने, अनधिकृतपणे गौण खनिजे काढणे, इत्यादींसाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री व साधनसामग्री आणि अशा गौण खनिजांची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणारी वाहतुकीची साधने ताब्यात घेण्यासाठी आणि ते सरकारजमा करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याला किंवा याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्याला अधिकार प्रदान करण्याकरिता उक्त कलम ४८ मध्ये पोट-कलम (८) ऐवजी नवीन पोट-कलम दाखल करून तातडीने ती सुधारणा करणे इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १२ जून २०१५.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनु कुमार श्रीवास्तव,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528


# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक ३२(२)] शुक्रवार, जून १२, २०१५/ज्येष्ठ २२, शके १९३७ [ पृष्ठे ३, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ६०


**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2015 (Mah. Ord. XII of 2015), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. A. SAYEED,
Principal Secretary and R.L.A. to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2015 (Mah. Ord. XII of 2015), published under the authority of the Governor].

---

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mumbai 400 032, dated the 12th June 2015.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2015.

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

Mah. XLI of 1966. AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes hereinafter appearing;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause *(1)* of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** *(1)* This Ordinance may be called the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2015.

*(2)* It shall come into force at once.

Amendment of section 48 of Mah. XLI of 1966.

**2.** In section 48 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as "the Revenue Code"),— Mah. XLI of 1966.

*(i)* in sub-section *(7)*,—

*(a)* for the words "on the order in writing of the Collector, to pay penalty not exceeding a sum determined, at three times", the words "on the order in writing of the Collector or any revenue officer not below the rank of Tahsildar authorised by the Collector in this behalf, to pay penalty of an amount equal to five times" shall be substituted ;

*(b)* the proviso shall be deleted ;

*(ii)* for sub-section *(8)*, the following sub-section shall be substituted, namely :—

"*(8)(1)* Without prejudice to the provision of sub-section *(7)*, the Collector or any revenue officer not below the rank of Tahsildar authorised by the Collector in this behalf, may seize and confiscate any mineral extracted, removed, collected, replaced, picked up or disposed of from any mine, quarry or other place referred to in sub-section *(7)*, the right to which vests in, and has not been assigned by the State Government, and may also seize and confiscate any machinery and equipment used for unauthorised extraction, removal, collection, replacement, picking up or disposal of minor minerals and any means of transport deployed to transport the same.

*(2)* Such machinery or equipment or means of transport, used for unauthorised extraction, removal, collection, replacement, picking up or disposal of minor minerals or transportation thereof, which is seized under sub-section *(1)*, shall be produced before the Collector or such other officer not below the rank of Deputy Collector authorised by the Collector in this behalf, within a period of forty-eight hours of such seizure, who may release such seized machinery, equipment or means of transport on payment by the owner thereof of such penalty as may be prescribed and also on furnishing personal bond of an amount not exceeding the market value of the seized machinery, equipment or means of transport, stating therein that such seized machinery, equipment or means of transport shall not be used in future for unauthorised extraction, removal, collection, replacement, picking up or disposal of minor minerals and transportation of the same.".

Amendment of section 328 of Mah. XLI of 1966.

**3.** In section 328 of the Revenue Code, in sub-section *(2)*, for clause *(xix)*, the following shall be substituted, namely :—

"*(xix)* under sub-section *(8)* of section 48, the rules prescribing the penalty to be paid by the owner for release of the machinery, equipment or means of transport used for unauthorised extraction, removal, collection, replacement, picking up or disposal of minor minerals; and under sub-section *(9)* of the said section 48, the rules to regulate the extraction and removal of minor minerals ; ".

## STATEMENT

Section 48 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), provides for Government titles to mines and minerals.

Sub-section *(7)* of the said section 48 provides for penalty not exceeding a sum determined at three times the market value of the minerals extracted, removed, collected, replaced, picked up or disposed of without lawful authority. The Government of Maharashtra considers it expedient to amend the said sub-section *(7)* to increase the penalty from "three times" to "five times" of the market value of the minerals so extracted, removed, collected, replaced, picked up or disposed of.

2. Sub-section *(8)* of the said section 48 provides that the Collector may seize and confiscate any minerals extracted, removed, collected, replaced, picked up or disposed of from any mine, quarry or other place referred to in sub-section *(7)*, the right to which vests in, and has not been assigned by the State Government. However, the provision of sub-section *(8)* does not empower the Collector to seize and confiscate the machinery and equipment used for unauthorised extraction, etc. of minor mineral and the means of transport deployed to transport such minor minerals.

Therefore, with a view to preventing illegal extraction and transportation of minor minerals, it is considered expedient to empower the Collector or any other officer not below the rank of Deputy Collector, authorised by the Collector in this behalf, to seize and confiscate the machinery and equipment used for unauthorised extraction, etc. of minor minerals and means of transport used for transporting such minor minerals, with immediate effect by substituting sub-section *(8)* of the said section 48.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 12th June 2015.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANU KUMAR SRIVASTAVA,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.